दैनिक

# महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990








लातूर वर्ष ३ रे अंक १२२ वा रविवार दि.०१ ऑक्टोंबर २०२३ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## संकटावर मात करण्याची महाराष्ट्राच्या प्रशासनात ताकद-शरद पवार





लातूर : किल्लारीच्या भूकंपाला आज ३० वर्षे पूर्ण झाली आहेत. यानिमित्त किल्लारीत माजी मुख्यमंत्री शरद पवार यांच्याप्रती कृतज्ञता सोहळा आयोजित करण्यात आला होता. या सोहळ्यात बोलताना शरद पवार यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला.

शरद पवार म्हणाले, आजचा दिवस हा अस्वस्थ करणारा दिवस आहे. राज्याच्या मुख्यमंत्र्यांकडे अनेक जबाबदा–या असतात. त्यात गणेशोत्सवात शेवटची मिरवणूक होईपर्यंत माहिती घ्यावी लागते. शेवटची परभणीची मिरवणूक झाल्यानंतर मी विश्रांती करायला गेलो आणि माझ्या घराच्या खिडक्या हलल्या. यावेळी मी भूकंप नोंदणी केंद्राकडे माहिती घेतली तेव्हा लातूरमध्ये भूकंप झाला हे कळलं. तेव्हाच मी सगळ्या पदाधिका–यांना कळवले आणि सकाळी ६ वाजता विमानाची मागणी केली आणि आम्ही पोहोचलो. आम्ही बघितले तर आम्हाला किल्लारी दिसली नाही. निसर्गाची अवकृपा झाली होती. त्यानंतर पुढच्या २–३ तासांत जवळच्या जिल्ह्या–तील डॉक्टर आणि अधिका–यांना बोलावून घेत–ले. पुनर्वसनाचे काम सुरू झाले. मी तिथेच मुक्काम केला. काम सुरू झालं. संकट मोठं होतं पण दोन्ही तालुक्यातील लोकांनी धैर्याने संकटाला तोंड दिले, असे शरद पवार म्हणाले.

विलासराव देशमुख, पद्मसिंह पाटील यांनी साथ दिली. जिल्हाधिका–यांनी देखील प्रचंड काम केले. मी ला–तूरला जाताना मध्ये रस्त्यात एक माणूस बैलगाडीत झोपलेला दिसला. मला वाटले त्याचे घर भूकंपात गेले. त्यामुळे तो बैलगाडीत झोपला. मात्र तो इतर कोणी नव्हता तर कलेक्टर होता, दिवसभर काम करून तो आराम करत होता, अशी आठवण शरद पवार यांनी सांगितली.

संकटात अनेक लहान मुले सापडली होती. त्या मुलांची पुण्यात व्यवस्था केली. त्या मुलांनी उत्तम शिक्षण घेतले. ते चांगल्या ठिकाणी कामाला लागले. मला हा कार्यक्रम माहीत नव्हता. कृतज्ञतेची काही गरज नव्हती. संकटातील लोकांना मदत करण्याची शिकवण ही यशवंतराव चव्हाण यांच्याकडून मिळाली असे शरद पवार म्हणाले.

## महाराष्ट्र भूषण पुरस्कार सोहळ्यास प्राध्यापक विठ्ठल कांगणे उपस्थित राहणार-अशोक देडे



लातूर: महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई जिल्हा शाखा लातूर आयोजित महाराष्ट्र भूषण पुरस्कार सोहळा लवकरच लातूर येथे संपन्न होणार आहे याचे निमंत्रण परभणी येथील विद्यार्थीप्रिय प्रा.विठ्ठल कांगणे यांना देण्यात आले असून ते या कार्यक्रमास उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती लातूर जिल्हा पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष अशोक देडे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात नमूद केले आहे.

लातूर जिल्हा पत्रकार संघाच्या वतीने टॉप टेन लातूर भूषण पुरस्कार सोहळा स्वर्गीय विलासरावजी देशमुख यांच्यासह अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत यापूर्वी घेण्यात आला परंतु या पुरस्काराची व्याप्ती वाढवून आता महाराष्ट्र भूषण पुरस्कार यावर्षीपासून लातूर जिल्हा पत्रकार संघाच्या वतीने घेण्याचा निर्णय सर्वानुमते ठरला आहे. सदर पुरस्कार सामाजिक,शैक्षणिक, राजकीय, क्रीडा,सांस्कृतिक,साहित्य, उद्योग,प्रशासकीय सेवा, वर्तमानपत्रातील व महिलांमधील उत्कृष्ट कार्य करणाऱ्या व्यक्तींना देण्याचे ठरले आहे.

या महाराष्ट्र भूषण सोहळ्यास विद्यार्थी प्रिय प्रा. विठ्ठल कांगणे यांना निमंत्रण देण्यासाठी जिल्हाध्यक्ष अशोक देडे, जिल्हा सचिव अशोक हनवते, शहराध्यक्ष महादेव डोंबे व वृत्तवाहिनी प्रमुख हरून मोमीन उपस्थित होते.

## देशात आतापर्यंत सरासरीच्या ९४ टक्के पाऊस

मुंबई : प्रतिनिधी

देशातील काही भागात चांगला पाऊस झाला तर काही भागात कमी पाऊस झाला. पावसाळ्याच्या सुरुवातीपासूनच सरसकट पाऊस झालाच नाही. आता अखेरच्या टप्प्यातही काही भागांत दमदार, तर रस्ते भिजविण्यापुरताच पाऊस पडत आहे. मात्र, हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार १ जूनपासून आतापर्यंत देशात सरासरीच्या ९४ टक्के तर राज्यात सरासरीच्या ९६ टक्के पावसाची नोंद झाली आहे. पुढच्या आठवड्यात राज्यातून मान्सून माघारी परतण्यास सुरुवात होणार आहे. केरळसह महाराष्ट्रात पावसाची मोठी तूट असल्याची माहिती हवामान विभागाने दिली.

राज्यात फक्त कोकणात समाधानकारक पाऊस झाला. कोकणात सरासरीच्या ११० टक्के, मध्य महाराष्ट्रात ८७ टक्के, मराठवाड्यात ८७ टक्के आणि विदर्भात ९७ टक्के पावसाची नोंद झाली. पुढच्या आठवड्यात राज्यातून मान्सून माघारी परतण्यास सुरुवात होण–ार आहे. पुढील दोन ते तीन दिवसांत देशाच्या पश्चिम–मध्य भागातून मान्सून परतण्यास सुरूवात होणार आहे. मराठवाड्यात परतीचा पाऊस दमदार पडतो.

## भूकंपग्रस्तांच्या मालकी हक्क प्रमाणपत्रासाठी संबंधित विभागाची बैठक घेऊन प्रश्न मार्गी लावणार - सभापती डॉ.निलमताई गोऱ्हे

लातूर दि. ३० ( जिमाका ) लातूर आणि धाराशिव जिल्ह्यात ३० सप्टेंबर १९९३ साली झालेल्या भूकंपात अनेक गावांचे पुनर्वसन झाले. त्यावेळी किल्लारीतील काही तांत्रिक कारणामुळे त्यांच्या घराचे मालकी हक्क प्रमाणपत्र ( कबाला ) मिळाले नाहीत. त्यासंदर्भातील पत्रव्यवहार जिल्हा प्रशासनाने मंत्रालयात केला आहे. आपण त्या संबंधित विभागाची बैठक घेऊन हा अनेक वर्ष प्रलंबित असलेला प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. निलमताई गोऱ्हे यांनी सांगितले.

लातूर जिल्हाधिकारी कार्यालयात लातूर आणि धाराशिव जिल्ह्या–तील भूकंपग्रस्तांच्या प्रलंबित प्रश्नाबाबत घेतलेल्या आढावा बैठकीत त्या बोलत होत्या. यावेळी आ. अभिमन्यू पवार, आ. ज्ञानराज चौघुले, लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर – घुगे, दूरदृश्य प्रणाली द्वारे उपस्थित धाराशिवचे जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओंबासे, लातूरचे पोलीस अधिक्षक सोमय मुंढे, लातूरचे उपजिल्हाधिकारी ( पुनर्वसन ) नितीन वाघमारे तसेच संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

किल्लारीतील काही जणांच्या पुनर्वसन झालेल्या घराचे मालकी हक्क प्रमाणपत्र काही तांत्रिक कारणामुळे मिळत नसल्यामुळे अशा लोकांना भूकंपग्रस्त प्रमाणपत्रही मिळत नाहीत त्यामुळे त्यांच्या मुलामुलींना नोकरी पासून ते अनेक लाभापर्यंत वंचीत राहावे लागते त्यामुळे हा प्रलंबित प्रश्न मार्गी लावावा अशी विनंती आ. अभिमन्यू पवार यांनी विधान परिषदेच्या सभापती निलमताई गोऱ्हे यांच्याकडे आजच्या बैठकीत केली. याविषयाचे गांभिर्य लक्षात घेऊन आपण याविषयी संबंधित विषयाच्या अधिकाऱ्यांची बैठक घेऊन हा प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले.

भूकंपग्रस्त भागातील काही गावामध्ये अंतर्गत रस्त्यांचे कामं प्रलंबित असल्याचे सांगून ते कामं पूर्ण करावीत अशा सूचनाही सभापती यांनी यावेळी दिल्या.

लातूर आणि धाराशिव जिल्ह्यातील भूकंपग्रस्त गावांचे पुनर्वसन झाले आहे. त्यामुळे गावांच्या जागा वन विभागाकडे हस्तांतरीत केल्या आहेत. त्याठिकाणी स्मृती वने निर्माण करावीत. किल्लारी सारख्या काही ठिकाणी वन विभागाने फुलपाखरू उद्यान सारख्या चांगल्या अभिनव गोष्टी केल्या आहेत. तशा इतर ठिकाणीही कराव्यात या वेगळेपणामुळे या स्मृती अधिक चांगल्या प्रकारे जतन होतील असे डॉ. गोऱ्हे यावेळी म्हणाल्या.

विस्तारित गावठाण कायम करणे, दांगट समिती अहवाल या विषयावर यावेळी सविस्तर चर्चा करून भूकंपग्रस्त भागातील विकास करताना तो शाश्वत करण्यावर दोन्ही जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी यांनी भर द्यावा अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

बालविवाह सारख्या प्रथा रोखण्यासाठी कडक उपाययोजना कराव्यात तसेच मुलींच्या मिसिंग केसेस बाबत जिल्हा पोलीस प्रशासनाने त्याबाबत अधिक जागृत राहून सापडलेल्या मुलींचे मानसिक पुनर्वसन तसेच त्यांचे समुपदेशन करण्यावर भर द्यावा अशा सूचनाही डॉ. गोऱ्हे यांनी यावेळी दिल्या.

## क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांचा लातूर जिल्हा दौरा

लातूर, दि. ३० (जिमाका) : राज्याच्या क्रीडा व युवक कल्याण, बंदरे विभागाचे मंत्री संजय बनसोडे हे रविवार, १ ऑक्टोबर २०२३ रोजी लातूर जिल्हा दौऱ्यावर आहेत. त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे.क्रीडा व युवक कल्याण मंत्री ना. बनसोडे हे १ ऑक्टोबर रोजी सकाळी १०.४५ वाजता शकुंतला निवासस्थान येथून दयानंद सभागृहाकडे प्रयाण करतील. याठिकाणी सकाळी ११ वाजता छत्रपती शिवाजी महाराज हिंदवी शिवराज्याभिषेक दिन व मराठवाडा मुक्तिसंग्राम अमृत महोत्सवी वर्षानिमित्त अखिल भारतीय

## किल्लारी भूकंपात बळी पडलेल्यांच्या स्मृतीला विधान परिषद उपसभापती निलमताई गोऱ्हे यांनी वाहिली श्रद्धांजली



लातूर दि. ३० ( जिमाका ) लातूर आणि धाराशिव जिल्ह्यात ३० सप्टेंबर १९९३ ला झालेल्या भूकंपात हजारो लोकं मरण पावले. त्या दुःखद घटनेला आज तीस वर्ष पूर्ण झाले, त्यासर्वांप्रती संवेदना व्यक्त करून विधान परिषदेच्या उपसभापती निलमताई गोऱ्हे यांनी किल्लारी येथील स्मृती स्तंभाला पुष्पचक्र वाहून श्रद्धांजली वाहिली.

यावेळी आमदार अभिमन्यू पवार, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर – घुगे यांच्यासह अधिकारी यांनी पुष्पचक्र अर्पण करून श्रद्धांजली वाहिली. फुलपाखरू उद्यानाचे लोकार्पण ज्या ठिकाणी भूकंप झाला ते निर्मनुष्य किल्लारी गाव वन विभागाकडे दिले आहे.वन विभागाने तिथे पूर्वीच नक्षत्र उद्यान उभं केलं आहे. आज उपसभापती निलमताई गोऱ्हे यांच्या हस्ते फुलपाखरू उद्यानाचे लोकार्पण करण्यात आले. हे फुलपाखरू उद्यान एक एकर एवढ्या क्षेत्रावर करण्यात आले आहे. या लोकार्पणावेळी आ. अभिमन्यू पवार, वन विभागाच्या उपविभागीय वन अधिकारी श्रीमती तांबे, औसा तहसीलदार भारत सूर्यवंशी, सहायक वन अधिकारी सचिन रामपुरे उपस्थित होते.

## उजनी येथे मोफत सर्वरोग निदान व उपचार आरोग्य शिबीर यशस्वीपणे संपन्न.

औसा – पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जन्मोत्सवानिमित्त साजरा केला जात असलेल्या सेवा पंधरवडा अंतर्गत आमदार अभिमन्यू पवार यांच्या संकल्पनेतून व क्रिएटिव्ह फाऊंडेशन तसेच विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय यांच्या माध्यमातून औसा तालुक्यातील उजनी येथे (दि.३०) सप्टेंबर रोजी मोफत सर्वरोग निदान व उपचार आरोग्य शिबीर यशस्वीपणे संपन्न झाले. या शिबिरात उजनी गावातील व पंचक्रोशीतील ११३० नागरिकांनी विविध आजारांची तपासणी करून घेतली. तपासणीदरम्यान काही गंभीर आजाराचे रुग्ण आढळून आले असून त्यांच्यावर महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना अंतर्गत मोफत वैद्यकीय उपचार करण्यात येणार आहेत.

सदरील शिबीर यशस्वी करण्यासाठी प्रविण कोपरकर, रमेश वळके, बी के माने, मधुकर रंदवे, डॉ सुभाष ढवण, चंद्रकांत ढवण, गोविंद मदने, लक्ष्मण दुधभाते, गिरीराज सोमाणी, विनोद जगताप, मझर पठाण, नामदेव काकडे, श्रीकृष्ण जगताप, राहूल रोगे, दत्ता पाटील, महेश चव्हाण, भारतसिंग राठोड, नाना बरडे, राहूल पिंपरे, संजय रंदवे, बिबिशन देवकर, सागर तापडीया, दिलीप कागे, अनिल कळबंडे, शाम सुर्यवंशी, सुरेश रेकणे, सिध्देश्वर गंगणे, मारूती टीपे, प्रभाकर ढवण, आण्णाराव सुर्यवंशी, राम ढवण, राधेश्याम जोशी, किशोर जाजू, प्रताप राजपूत, पवन बरदापुरे, कुलदीप रेकणे, शहाजी थोरे, पांडुरंग कदम, गोविंद जाजू, ओमप्रकाश सगर, भागवत सगर, रणजित राठोड, दीनदयाळ संमुद्र जोशी, दिपक पोळ, विकास सक्राळे, आनंद कोपरकर, सतीश तोष्णीवा, खंडू जाधव, डॉ मेघराज चावडा, डॉ आनंद बरगाले, डॉ रोहित माले, डॉ अश्विनी बुड्डे, डॉ सौरभ सिंग, डॉ शब्बीर राजा, डॉ सुशांत देशमुख, डॉ समृद्धी नाथ, डॉ अक्षय दांडेकर, डॉ ऐश्वर्या




भांडेकर, हेमंत लोहारे, डॉ रेवनाथ देवणीकर, डॉ राजपाल कदम, सचिन औसेकर, श्रीमंगले नरसिंग, श्री मनोज कांबळे आदी वैद्यकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांनी आणि आशा कार्यकर्त्या उपस्थित होत्या.

# संपादकीय....

## वेस्ट इंडिजच्या गतवैभवाच्या राहिल्या फक्त आठवणी

एकेकाळी क्रिकेटजगतावर अधिराज्य गाजवत दोन विश्वविजेतेपदं नावावर करणारा वेस्ट इंडिजचा संघ यंदाच्या वर्ल्डकपमध्ये दिसणार नाही. जाणून घ्या वेस्ट इंडिजची अधोगती का झाली? यंदाच्या जुलै महिन्याचा पहिला दिवस वेस्ट इंडिजचे क्रिकेटपटू कधीच विसरू शकणार नाहीत. याच दिवशी आपण भारतात होणारा वर्ल्डकप खेळू शकणार नाही हे स्पष्ट झालं. झिम्बाब्वे, नेदरलँड्स आणि स्कॉटलंडविरुद्ध पराभूत झाल्याने वेस्ट इंडिजचा संघ वर्ल्डकप स्पर्धेसाठी पात्र ठरू शकला नाही. १९७५ ते २०२३ या ४८ वर्षांच्या वर्ल्डकप इतिहासात पहिल्यांदाच वर्ल्डकप स्पर्धेत वेस्ट इंडिजचा संघ नसेल. प्रमुख संघापैकी एक असलेल्या वेस्ट इंडिजला वर्ल्डकपमध्ये खेळण्यासाठी पात्रता फेरी स्पर्धेत खेळावं लागणं हीच नामुष्की होती. या स्पर्धेत जेतेपदासह वेस्ट इंडिजचा संघ वर्ल्डकपमध्ये दिमाखात प्रवेश करेल अशी चाहत्यांना अपेक्षा होती. पण तसं झालं नाही आणि वेस्ट इंडिजला गतवैभवातच रमावं लागेल हे पक्कं झालं. पहिलावहिला वर्ल्डकप वेस्ट इंडिजने जिंकला. चार वर्षानंतर त्याच वर्चस्वाने खेळत दुसराही वर्ल्डकप जिंकला. सत्तर, ऐंशी आणि नव्वदीच्या दशकापर्यंत वेस्ट इंडिजचा आंतरराष्ट्रीय क्रिकेटवर दबदबा होता. विविअन रिचर्ड्सससारखा दिग्गज फलंदाज, गॉर्डन ग्रीनिज आणि डेसमंड हेन्स ही बिनीची जोडी, क्लाईव्ह लॉईडसारखा चतुर कर्णधार, जोएल गार्नर, मायकेल होल्डिंग, कॉलिन क्राफ्ट आणि अँडी रॉबर्ट्स, माल्कम मार्शल हे आग ओकणारे गोलंदाज. वेस्ट इंडिजचा सामना म्हटला की त्यांचा विजय पक्का असायचा. त्यांच्या गोलंदाजांचा सामना करताना फलंदाज जखमी व्हायचे. प्रतिस्पर्ध्यांवर त्यांची दहशत होती. २०१० मध्ये प्रदर्शित झालेल्या फायर इन बॅबिलोन डॉक्युमेंट्रीत वेस्ट इंडिजच्या वर्चस्वाची झलक अनुभवायला मिळते. आणखी वाचा: थीश्रव र्ऊीिउीळलझशीं : पेटलेलं इडन गार्डन्स आणि ओक्साबोक्शी रडणारा विनोद कांबळी१९७६ ते १९८६ या दशकभरात वेस्ट इंडिजने १७ पैकी १५ कसोटी मालिका जिंकल्या. याच काळात त्यांनी वनडे क्रिकेटमध्ये दोन वर्ल्डकप नावावर केले. १९८३ वर्ल्डकपमध्येही ते फायनलमध्ये होतेच. भारतीय संघाने दमदार सांघिक खेळ करत बलाढ्य वेस्ट इंडिजला नमवण्याची किमया केली होती. १९७५ ते १९८७ या कालावधीत वेस्ट इंडिजने खेळलेल्या वनडे सामन्यांपैकी ७४ टक्के सामने जिंकले. वेस्ट इंडिज क्रिकेटचा तो सुवर्णकाळ होता. दर्जेदार खेळाडू, दडपणाच्या क्षणी कामगिरी उंचावण्याची हातोटी, अफलातून फिटनेस आणि कमालीचं सातत्य यामुळे वेस्ट इंडिजच्या संघाचा अचंबा वाटायचा.पण जसे हे खेळाडू निवृत्त होऊ लागले, संघ बदलला तसं वेस्ट इंडिज क्रिकेटमध्ये बदल घडू लागले. एकेकाळी ज्यांनी क्रिकेटजगतावर अधिराज्य गाजवलं त्या वेस्ट इंडिजला २००० ते आतापर्यंत झालेल्या ४७५ वनडे सामन्यांपैकी २६४मध्ये पराभवाला सामोरं जावं लागलं आहे. ज्यांच्या नावावर दोन विश्वविजेतेपदं आहेत त्या वेस्ट इंडिजची वर्ल्डकपमधली कामगिरीही खालावतच जाणारी आहे. वर्ल्डकप स्पर्धेत वेस्ट इंडिजने ८० सामने खेळलेत. यापैकी ३५ मध्ये त्यांचा पराभव झाला आहे.पण ही घसरण काही दिवसात झालेली नाही. अनेक वर्षांतील सामाजिक, आर्थिक, राजकीय घडामोडींचा परिपाक म्हणजे ही अवस्था आहे. गेल्या वर्षी झालेल्या ट्वेन्टी२० विश्वचषकासाठीही वेस्ट इंडिजला पात्र होता आलं नाही. त्यातून बोध घेत परिस्थिती सुधारेल असं वाटलं होतं पण चाहत्यांच्या पदरी निराशाच पडली.आणखी वाचा: उीळलझशीं थीश्रव र्ऊीि जेव्हा ऑस्ट्रेलिया आणि वेस्ट इंडिजने श्रीलंकेत खेळायला नकार दिला होता वेस्ट इंडिज हा देश नाही. कॅरेबियन आयलंड्स अर्थात अनेक बेटांचा समूह आहे. प्रत्येक बेट हा स्वतंत्र देश आहे. अन्य खेळांमध्ये स्वतंत्र देश म्हणूनच प्रतिनिधित्व करतात पण क्रिकेटच्या मैदानात एकत्र येऊन वेस्ट इंडिज म्हणून खेळतात. वेस्ट इंडिज देश नसल्याने त्यांच्या सामन्यावेळी एक समूहगीत गायलं जातं. वेस्ट इंडिज क्रिकेट बोर्डाची आर्थिक स्थिती बरी नाही. बोर्ड आणि खेळाडू यांच्यात मानधनाच्या मुद्यावरून प्रदीर्घ काळ वाद सुरू आहे. वेस्ट इंडिजसाठी करारबद्ध होऊन खेळण्यापेक्षा जगात विविध ठिकाणी सुरू असलेल्या ट्वेन्टी२० लीग खेळून भरपूर पैसा मिळत असल्याने वेस्ट इंडिजच्या खेळाडूंचं प्राधान्य बदललं. कायरेन पोलार्ड, आंद्रे रसेल, सुनील नरिन, ड्वेन ब्राव्हो हे खेळाडू आयपीएलसह जगभरात ट्वेन्टी२० लीग खेळतात पण वेस्ट इंडिजसाठी खेळण्यासाठी त्यांना वेळ नसतो. समाधानकारक पैसा मिळत नसेल तर खेळाडूंसमोर लीगमध्ये खेळणं हाच उतारा आहे. पैसा असेल तर स्पर्धांचं आयोजन, मैदानांची उभारणी, प्रतिभाशोध कार्यक्रम, चांगले प्रशिक्षक आणि तंत्रज्ञ यांची नियुक्ती अशा सगळ्या गोष्टी करता येतात. पण आयसीसीचं सध्याचं आर्थिक प्रारुप हे बिग थ्री अर्थात भारत, ऑस्ट्रेलिया, इंग्लंड केंद्रित आहे. वेस्ट इंडिजला मिळणारा वाटा ४.५८ टक्के इतकाच आहे. चांगले खेळाडू घडण्यासाठी तशी व्यवस्था उभी करावी लागते. त्यासाठीचा पैसा वेस्ट इंडिज बोर्डाकडे नाही. वेस्ट इंडिजकडे गुणवान खेळाडूंची कमतरता नाही. पण या खेळाडूंना आर्थिक स्थैर्य मिळवून देणं बोर्डाला शक्य नाही. वेगवेगळ्या बोर्डांचं मिळून प्रशासन तयार झालं आहे. हा एक विस्कळीत ढाचा आहे. त्याचा फटका खेळाडूंना बसतो. वेस्ट इंडिजचे क्रिकेटपटू अन्य देशात जाऊन खेळत असल्याचंही चित्र समोर येतं आहे. २०१९ वर्ल्डकप स्पर्धेत वेगवान गोलंदाज जोफ्रा आर्चरने इंग्लंडला जिंकून देण्यात मोलाची भूमिका बजावली होती. आर्चर हा वेस्ट इंडिजचा आहे. त्याचा सहकारी ख्रिस जॉर्डनही वेस्ट इंडिजचाच आहे. चांगला पैसा, संधी, स्थैर्य, जीवनशैली मिळत असल्याने या दोघांनी इंग्लंडसाठी खेळण्याचा निर्णय घेतला.आणखी वाचा: उीळलझशीं थीश्रव र्ऊीि पाऊस जेव्हा दक्षिण आफ्रिकेच्या विजयाचा घास हिरावतो वेस्ट इंडिज बेटांवर बास्केटबॉल, फुटबॉल यांची लोकप्रियता वाढणं हाही महत्त्वाचा मुद्दा आहे. वेस्ट इंडिज आणि अमेरिका यांच्यातलं भौगोलिक अंतर किती कमी आहे हे नकाशा पाहिल्यावर समजतं. फुटबॉल आणि बास्केटबॉल संस्कृती वेस्ट इंडिज अर्थात कॅरेबियन बेटांवर रुजल्याने क्रिकेटमधलं स्वारस्य कमी होत गेलं.२०१९ मध्ये वर्ल्डकप झाला होता. त्या स्पर्धे पासून आतापर्यंत चार वर्षात वनडेत सर्वाधिक धावा वेस्ट इंडिजच्या शे होपच्या नावावर आहेत.पण तो या वर्ल्डकपमध्ये खेळणारच नाहीये. या चार वर्षात वनडेत सर्वाधिक विकेट्स पटकावणाऱ्यांच्या यादीत वेस्ट इंडिजचा अल्झारी जोसेफ तिसऱ्या स्थानी आहे. पण तोही वर्ल्डकपमध्ये दिसणार नाही. खेळाडू वैयक्तिक पातळीवर उत्तम कामगिरी करत आहेत पण संघ म्हणून कमी पडत आहेत. हे आकडेवारीतून सिद्ध होत आहे. या चार वर्षात वेस्ट इंडिजने ५७ वनडे सामने खेळलेत आणि ३२ मध्ये त्यांना पराभवाला सामोरं जावं लागलं आहे.

# ‘काँग्रेस’मुक्तीचा आनंद

लखनौच्या संभाव्य विज्ञान परिषदेत नद्यांच्या पाण्याची आंतरिक स्वच्छता, आण्विक होरपळीवर गोमय लेप अशा वैश्विक विषयांवर मार्गदर्शन होईल अशी अनेकांस आशा होती. आता परिषदच भरणार नसल्यामुळे बाबा–बापू आणि तत्सम काही साध्वी–आचार्यांचा हिरमोड होणार असून त्यांच्या ज्ञानामृतांतून अज्ञ भारतीयांस उद्धाराची संधी केंद्राच्या नकारात्मक निर्णयामुळे नाकारली जाणार आहे. विज्ञान, वैज्ञानिकता आणि छद्मविज्ञान यांच्या बेमालूम सरमिसळणीच्या काळात ‘इंडियन सायन्स काँग्रेस’ची परंपरा देदीप्यमान म्हणावी अशी आहे. सुमारे १०८ वर्षांपूर्वी १९१४ साली कोलकाता येथे ‘साहेबा’च्या अमलाखाली या वार्षिक मेळाव्याची मुहूर्तमेढ रोवली गेली. तत्कालीन रसायनशास्त्रज्ञ जे. एल. सिमोनसेन आणि पी. एस. मॅकमोहन हे दोन प्राध्यापक या परिषदेचे जनक. पारतंत्र्यात असूनही या देशात विज्ञानदीपक लावायला हवा आणि त्यासाठी आपण प्रयत्न करायला हवेत हा त्यांचा यामागील उदात्त विचार. त्यातूनच भार–तातील वैज्ञानिकांना एका छत्राखाली वर्षांतून एकदा तरी एकत्र आणता यावे आणि त्यातील चर्वितचर्वणातून विज्ञान संशोधनाला गती यावी हा त्यांचा उद्देश. त्यातून १९१४ साली कोलकाता या ब्रिटिश अमलाखालील राजधानीसदृश शहरा–तील ‘एशियाटिक सोसायटी’त या काँग्रेसचे पहिले अधिवेशन भरले. तेव्हाच्या कोलकाता विद्यापीठाचे कुलगुरू आशुतोष मुखर्जी या पहिल्या मेळाव्याचे अध्यक्ष होते. उद्घाटनाचे वर्ष असूनही शंभराहून अधिक वैज्ञानिक आणि विज्ञानाभ्यासक या परिषदेस हजर होते. त्यानंतर दर वर्षी अशी परिषद भरत गेली. तिचा आवेग इतका होता की १९३८ सालच्या सायन्स काँग्रेसच्या रौप्यमहोत्सवी अधिवेशनास रूदरफोर्डसारखा अव्वल वैज्ञानिक अध्यक्ष म्हणून लाभला. दुर्दैवाने ते उपस्थित राहू शकले नाहीत. त्याआधीच त्यांचे निधन झाले. पण तेव्हापासून या देशी परिषदेत परदेशी वैज्ञानिकांचा सहभाग सुरू झाला. तिचे महत्त्व आणि प्रभाव इतका व्यापक झाला की १९४७ साली स्वातंत्र्याचे वारे वाहत असतानाही त्या वर्षीच्या जानेवारी महिन्याच्या पहिल्या आठवड्यात या सायन्स काँग्रेसचे अधिवेशन भरले आणि त्या राजकीय धामधुमीतही पंडित जवाहरलाल नेहरू यांनी या अधिवेशनाचे अध्यक्षस्थान भूषवले. त्यानंतर पंतप्रधानांनी या अधिवेशनाचे उद्घाटन करणे, अध्यक्षस्थान भूषवणे याची परंपरा तयार झाली आणि दर वर्षांचे स्व–ागत या विज्ञान परिषदेने होऊ लागले. स्वतः पं. नेहरू यांची विज्ञाननिष्ठा वादातीत. त्यांच्याच काळात आजच्या अनेक विज्ञानसंस्था उभ्या राहिल्या आणि त्यांच्या विज्ञाननिष्ठेने देशातील विज्ञान साक्षरतेस गती आली. त्यांच्याच उप–स्थितीत ६३ साली या परिषदेचा सुवर्ण महोत्सव साजरा झाला. डी. एस. कोठारी यांच्यासारखा कडवा विज्ञानवादी आणि शिक्षणतज्ज्ञ या परिषदेच्या अध्यक्षस्थानी होता. इतक्या वर्षांत जगदीशचंद्र बोस, प्रफुल्लचंद्र रे, विश्वेसरय्या, सी. व्ही. रमन, शांती स्वरूप भटनागर, होमी भाभा, हुमायुँ कबीर, एम. एस. स्वामिनाथन, प्रो. सी. एन. आर. राव, वसंत गोवारीकर अशा एकापेक्षा एक महानुभावांनी या परिषदेचे उद्घाटक वा अध्यक्षस्थान भूषवले. तथापि जवळपास गेल्या १०८ वर्षांची समृद्ध परंपरा लाभलेली

लेली विज्ञान परिषदेची २०१९ साली भरलेली १०६ वी बैठक खूप चर्चिली गेली. तीत पंतप्रधान मोदी सर्वार्थाने चर्चाविषय होते. विज्ञानात नोबेल मिळवणारे अर्धा डझन जागतिक दर्जाचे वैज्ञानिक आणि ३० हजारांहून अधिक देशी विज्ञानवंत या परिषदेस उपस्थित होते. पण ती परिषद गाजली ती ‘नरेंद्र मोदी लहरी’मुळे. न्यूटन, आईन्स्टाईन आदींचे गुरुत्वाकर्षांचे सिद्धांत पूर्णपणे चुकीचे आहेत आणि या गुरुत्वाकर्षणीय लहरींना ‘नरेंद्र मोदी लहरी’ असे नाव दिले जावे, अशी मागणी या परिषदेत केली गेली. इतकेच नव्हे तर दैत्यसम्राट रावण याच्याकडे विविध २४ प्रकारची विमाने होती आणि त्याने सध्याच्या श्रीलंकेत त्या वेळी विमानतळांचे जाळे उभारले होते अस–`ही या विज्ञान परिषदेत सांगितले गेले. तसेच




‘इंडियन सायन्स काँग्रेस’ २०२४ साली भरणार नाही. केंद्र सरकारच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान खात्याने भारतीय विज्ञानविश्वासाठी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या या वार्षिक परिषदेतून अंग काढून घेत असल्याचे जाहीर केले आहे. पुढील वर्षाची सायन्स काँग्रेस लखनौ येथे भरणार होती आणि तिच्या तयारीबाबत अलीकडच्या काळात अनेकदा माहिती दिली जात होती. पण आयोजकांवर आर्थिक गैरव्यवहाराचा ठपका ठेवत केंद्र सरकारने या परिषदेत सहभागी न होण्याचा निर्णय घेतला आहे. याचा अर्थ या परिषदेच्या प्रथेप्रमाणे नववर्षांच्या सुरुवातीस पंतप्रधान नरेंद्र मोदी या परिषदेस हजेरी लावणार नाहीत. वास्तविक पंतप्रधान मोदी यांची उपस्थिती अस–

कृत्रिम गर्भधारणा पूर्वीच्या काळात भारतीयांना अवगत होती, अगडबंब डायनोसोर्स ही ब्रह्मदेवा–ची निर्मिती आणि भगवान विष्णूने तर साक्षात क्षेपणास्त्रे विकसित केली होती इत्यादी मौलिक माहितीही या परिषदेत दिली गेली. एरवीही प्लास्टिक सर्जरीचा उगम भारतात आहे आणि गणेश हे त्याचे दृश्यरूप असा वैज्ञानिक दावा पंतप्रधानांनी विज्ञान परिषदेच्या व्यासपीठावर केल्याची ऐतिहासिक नोंद आहे. त्यानंतर यंदाच्या विज्ञान काँग्रेसने तर इतिहास घडवला. महाराष्ट्राची राज–सांस्कृतिक राजधानी असलेल्या नागपुरात झालेल्या सायन्स काँग्रेसने हळदी–कुंकूच आयोजित केले होते. तीत सहभागी महिला वैज्ञानिकांची खणा–नारळाने ओटी भरली गेली किंवा काय आणि पुरुष वैज्ञानिकांसाठी कीर्तन महोत्सव होता किंवा काय, याचा तपशील हाती नाही. पण त्यानंतर आता लखनौ येथील संभाव्य विज्ञान परिषदेकडे समग्र भारतवर्ष डोळे लावून बसले होते. या परिषदेत भारतीय नद्यांच्या पाण्याची आंतरिक स्वच्छता, आण्विक होरपळीवर गोमय लेपाचा उपाय अशा काही वैश्विक विषयांवर मार्गदर्शन होईल अशी अनेकांस आशा होती. त्यावर विज्ञान खात्याने पाणी आ–`तले. आता ही विज्ञान परिषदच भरणार नाही. त्यामुळे बाबा–बापू आणि तत्सम काही साध्वी–आचार्यांचा कमालीचा हिरमोड होणार असून अज्ञ भारतीयांस त्यांच्या ज्ञानामृतांतून उद्धाराची संधी केंद्राच्या या नकारात्मक निर्णयामुळे नाकारली जाणार आहे. विज्ञान परिषदांपासून सरकारने कायमच लांब राहायचे की हा निर्णय यंदापुरताच याचा खुलासा अद्याप झालेला नाही. भारतीयांत ठासून भरलेल्या विज्ञानप्रेमावर केंद्राच्या या निर्णयाचा दूरगामी परिणाम होणार असल्याने अशा परिषदांतून सरकार कायमचेच अंग काढून घेणार नाही, अशी आशा. तसे झाल्यास भारतीय वैज्ञानिकांनी कोणाच्या तोंडाकडे पाहावे, चंद्रयान प्रक्षेपणाचा मुहूर्त कोणती ग्रहदशा पाहून कसा काढावा इत्यादी प्रश्न निर्माण होतात. त्याची उत्त–रे लवकरात लवकर मिळतील अशी व्यवस्था केंद्रीय विज्ञान मंत्रालय करेल, ही आशा. नपेक्षा महासत्तापदाचा मार्ग अधिक खडतर होण्याचा धोका संभवतो. कदाचित असेही असेल की ‘इंडियन सायन्स काँग्रेस’ या नावातच तिचे मरण असावे. एक नव्हे तर दोन दोन मृत्युयोग या ना–वात दिसतात. पहिला म्हणजे इंडियन. जाज्वल्य भारतात हे मिळमिळीत इंडियन कसे काय खपून घेतले जाईल? इतकी वर्षे ते सहन झाले. पण नव्या भारतात जुनी इंडियन राहणे नाही. दु–सरे म्हणजे विज्ञान परिषदेत ‘काँग्रेस’ असावी? यापरते अधिक मोठे कोणते पाप नाही. या पा–पास शांत नाही आणि उताराही नाही. काँग्रेसमुक्त भारताची हाक आपल्या सर्वोच्च नेत्यांनी दिले–ली असताना हे वैज्ञानिक कोण टिकोजीराव लागून गेले की आपल्या नावात अजूनही ते काँग्रेस जिवंत ठेवण्याचे औद्धत्य करतात. अशी सांस्कृतिक बदफैली करणाऱ्या सायन्स काँग्रेसला मूठमाती देऊन तीस नवीन रूपात आणण्याचा विचार कदाचित या निर्णयामागे असावा. या नव्या रूपातील, नव्या रंगातील आणि नव्या ढंगातील विज्ञान परिषदेच्या यज्ञयागाची घोषणा लवकर व्हावी. तोपर्यंत हे क्षेत्र तरी ‘काँग्रेसमुक्त’ झाले याचा आनंद आपण साजरा करू या.

# शून्यातून विश्व निर्माण करणारी मुलगी,पत्नी आणि आई.

राष्ट्रमाता जिजाऊ,राष्ट्रमाता सावित्रीबाई,राष्ट्रमाता अहिल्याबाई, माता रमाई,माता भिमाई, यांचा आदर्श सुशिक्षित स्त्रिया किती प्रमाणात ठेवतात,सुशिक्षित स्त्रीया त्यांचा आदर्श ठेऊन वागत नसल्या तरी अशिक्षित स्त्रिया मोठ्या प्रमाणात आदर्श ठेऊन तसा वागतात,म्हणूनच त्या मुलगी,पत्नी आणि आईच्या भूमिकेतून शून्यातून विश्व निर्माण करून प्रेरणादायी,आदर्श स्त्रीया ठरतात.मुलीचे लग्न करण्यासाठी किती दिवस अगोदर मुलाचा शोध घ्यावा लागतो, जवळचे नातलगांना मित्रमंडळींना सांगून ठेवा लागते मुलीचे लग्न करायचे आहे, चांगला मुलगा असेल तर लक्षात ठेवा. नंतर सुरुवात होते मुलगी पाहण्याचा, प्रथम मुलगी पाहिल्यावर मुलाने मुलगी पसंत केली तर पुढची बोलणी सुरू होते.मुलीला मुलगा पसंत आहे की नाही त्यांचा पूर्ण अधिकार पूर्वी वडील,भाऊ,काका, मामा यांनाच असायचा मुलीला विचारले तर तिचे एकच उत्तर असायचे तुम्ही जो निर्णय घेतला तो मला मान्य असेल.किंवा तिच्या पसंतीचा प्रश्न येत नव्हता.वडीलधारी जो निर्णय घेतील तो मान्यच असला पाहिजे. कोणतीही मुलगी मुलांचे घरदार स्वतःच्या डोळ्याने पाहत नाही,ते घरातील भाऊ,काका, मामा हे पाहूनच मुलीला घर कसे आहे त्याबाबत सांगत असतात. मुलगी ते ऐकूनच लग्न करते आणि लग्न झाल्यावर प्रथम दिल्या घरी जाते.आणि जे आहे तेच स्वीकारते,तिथे तिची मूलगीची भूमिका संपत आणि पत्नी,बायकोच्या नवीन भूमिकेत प्रवेश करते.ती तिच्या यशस्वी जीवनाची सुरवात होते.

पांच भावांची लाडकी बहीण जेव्हा खेडे सोडून भांडुपच्या मिलिंद नगर झोपडपट्टीत आठ बाय सहाच्या कारव्याच्या कुडाच्या घरात प्रवेश करते,तेव्हा तिच्या मनात व चेहऱ्यावर कोणतेही दुःख दिसत नाही ती सासु,सासरा व नवरा या तिघात चौथी तन मन धनाने एकरूप होते. ती कधीच विचार करीत नाही. माझे भाऊ कुठे राहतात. मी कुठे राहते. आज त्या माझा आईचा चंद्रकला सागर तायडे चा आम्हाला गर्व वाटतो. आता जे भी नातलग व ओळखीचे लोक भेटतात ते गुलाबराव हिवराळे डीघी,तालुका नांदुरा,जिल्हा बुलढाणा यांच्या बहिणीने अपार कष्ट त्याग करून नांव काढले म्हणतात, मुलगी,पत्नी झाल्यावर ती आई होते, त्यावेळी तिने जे कष्ट केले त्यांचे फळ आज ती आमची आई म्हणूनच सुखा समाधानाने खाते. मुलगी कोणाची पत्नी म्हणून जेव्हा येते तेव्हा तिची ओळख सासु सासरे,नवरा या कुटुंबाशी रक्ताच्या नात्याने जोडली जाते,असे म्हणतात की प्रत्येक यशस्वी पुरुषाच्या मागे एका स्त्रीचा हात असतोच. प्रत्येक पुरुषाला वाटते की जी मुलगी (स्त्री) लग्न करून आपल्या घरी येईल ती भाग्यशाली असावी तिच्यामुळे आपले घर हे नंदनवन व्हावे त्याच बरोबर तिने आपल्या घराची व आपल्या कुटुंबाची चांगली काळजी घ्यावी व आपल्या आयुष्यात आनंदी आनंद निर्माण करावा. काही पुरुषांच्या बाबतीत हे खरे देखील होते व त्यांच्या घरात येणारी स्त्री खरोखरच आनंद व भाग्य घेऊनच घरात येते व घरातील संपूर्ण वातावरणात आनंद पसरवते.भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म यात अशा स्त्रियांची पाच लक्षणे सांगितली आहेत की ज्या स्त्रियांमध्ये हे गुण असतात त्या स्त्रीला लग्न होऊन ज्या घरी जातात त्या घराला नंदनवन बनवितात.त्यांचे जिते जागते उदाहरण म्हणजे चंद्रकला सागर तायडे माझ्या आईचा संसार आहे.काल २७ सप्टेंबर २०२३ ला साठ वर्षाची झाली.त्यामुळेच हे मी अगोदरच लिहून ठेवले होते.

पहिला गुण म्हणजे मुलगी,पत्नी (स्त्री) म्हणून घरात येते आणि घरातील नकारात्मक विचार काढून सकारात्मक विचारांचे वातावरण निर्माण करते.अशा वातावरणात राहणारे कुटुंब सुखी व आनंदी होते. अनेक कुटुंबातील लोकांचे म्हणणे असते की मुलगा लग्न झाल्यावर चांगला सुधरील (व्यसन धीन असला तर) जबाबदारी काय असते, ते बायको आल्यावरच त्याला बरोबर समजते.पण असे होतांना कुठे फारसं दिसत नाही. दुसरा गुण म्हणजे समाधानी वृत्ती! जी स्त्री अगदी छोट्या छोट्या गोष्टींवर समाधान मानते,जास्त हव्यास करीत नाही तिचा पती देखील तिच्या सोबत आनंदी असतो, काही स्त्रीया जर शेजारी काही वस्तू आली की आपल्या घरात ती यायलाच हवी असे वर्तन करतात.यामुळे त्यांच्या इच्छा व मागण्या पूर्ण करता करता त्यांच्या पतींच्या नाकीनव येतात व कधी कधी त्यांच्या अवास्तव अपेक्षा पूर्ण करण्यासाठी पतीला वाईट कामे करावी लागतात त्यात त्याला आपोआप गुंतवावे लागते व त्यामुळे त्याचे वाईट परिणाम संपूर्ण कुटुंबाला भोगावे लागतात, म्हणून जर स्त्री समाधानी असेल व तिच्या गरजा मर्यादित असतील तर त्या पूर्ण करताना पतीला देखील जास्त कष्ट करावे लागत नाही व घरातील वातावरण आनंदी व समाधानी राहते. नाक्यावर काम करून जेव्हा एखादा माणूस शैक्षणिक, सामाजिक आणि आर्थिक दृष्ट्या प्रगती करतो. तेव्हा त्यात त्यांच्या पत्नीचा शंभर टक्के वाटा असतो. बाहेर माणूस किती ही हुशार असला तरी त्यांचे घरात व घरातील मुलावर लक्ष नसले की मुलं शिक्षण घेण्याकडे लक्ष कमी देतात व वाईट मार्गाला लागतात.पण माणसापेक्षा स्त्रीने मुलांवर लक्ष देऊन शिक्षण व संस्कार दिले तर मुलं कधीच वाईट मार्गाला लागत नाही, त्यांचे उत्तम उदाहरण म्हणजे आम्ही चार भावंड होत. बाबांनी कधीच घरात लक्ष दिले नाही, शाळेत कधीच शिक्षकांना भेटले नाही,कधी घरात रेशन धान्य,भाजीपाला आणला नाही,कधी स्वतः चाय बनवून पिले नाही,टाटा पॉवर कंपनीत नोकरी करत असतांना सुद्धा असंघटित नाका कामगारांना संघटित करण्यासाठी वेळ दिला,चळवळीसाठी वेळ होता.पण पत्नी,मुलासाठी २०१७ पर्यत कधीच वेळ दिला नाही,२०१७ ला मात्र आईला मावशी,बापूला सोबत घेऊन सारनाथ,लिबुनी,नेपाळ,वैशाली,नालंदा, बुद्धगया सर्व प्रसिद्ध स्थळांना भेटी दिल्या. २०१८ ला विनिश केदारे,ममता सरोदे यांच्या वर्ड टूर सोबत बँकॉक थायलंड च्या दहा प्रमुख प्रसिद्ध शहरातील स्थळांना भेटी देऊन सात दिवस सहा रात्र फिरून आले,२०१९ वर्ड टूर सोबत श्रीलंका आठ प्रमुख प्रसिद्ध शहरातील स्थळांना भेटी देऊन सात दिवस सहा रात्र फिरून आले. ३८ वर्षात कुठेही न नेणाऱ्या बाबांनी आईला बुद्धगया,बँकांक, श्रीलंका फिरून आणले त्यामुळे त्या दोघांना ही कष्ट,त्यागाचे समाधान लाभले.आयुष्यात कधी जे स्वप्न पाहिले नव्हते. ते साकार करून घेतले.हे त्यांच्या दुसरा गुण म्हणजे समाधानी वृत्ती! कुशल कामाचं फळ आहे. तिसरे लक्षण म्हणजे, स्त्री मध्ये धैर्य आणि धाडस असावे. कोणतीही परिस्थिती असली तरी देखील न डगमगता त्या परिस्थितीला सामोरे जाण्याची जिद्द त्याग,कष्ट करण्याची तयारी स्त्रीमध्ये असावी लागते, तेव्हाच कितीही वाईट परिस्थिती असली तरी स्त्री भक्कम पणे आपल्या कुटुंबाच्या पाठीशी उभी राहली तर घरामध्ये आर्थिक सामाजिक जिव्हाळा निर्माण करणारी परिस्थिती तयार होयाला वेळ लागत नाही. कारव्याच्या घरात भाड्याने राहणारी मुलगी,पत्नी आणि आई आज चार चार घरांची मालकीण आहे.हे पाहिल्यावर तिच्या कष्टाची,त्यागाची आठवण झाल्या शिवाय राहत नाही,तर काही लोक फक्त मनातून म्हणतात काय होतीस तू आणि काय झालीस तू पण बुद्ध म्हणतात कुशल कर्माचे फळ कधीही कुशलच असते. चौथे लक्षण म्हणजे राग न येणे तसे पाहायला गेले तर हा गुण असणाऱ्या स्त्रिया मिळणे अवघड आहे, कारण राग येणे हा स्त्रीचा जन्मताचाच स्वभाव असतो. परंतु अति राग करणे, चिडचिड करणे, कर्कश आवाजात बोलणे अशी लक्षणे स्त्रीमध्ये असू नयेत थोडा फार राग सर्वच स्त्रियांना येतो व तो यायलाच हवा त्या रागाचा आतल्या आत मोठा साठा होऊन कधीतरी त्याचा मोठा स्फोट होऊ शकतो व त्याचे वाईट परिणाम होऊ शकतात.जर स्त्री सारखी राग राग करीत असेल किंवा चीड चीड करीत असेल तर त्या घरातील शांतता निघून जाते व भांडणे आणि वाद विवाद होत राहतात म्हणून स्त्रीने नेहमीच शांत असावे.तरच ती सासरला माहेरशी जोडण्याचे काम योग्य प्रकारे करू शकते.मुलगी पत्नी झालीच नाही तर?. कुटुंबाची आर्थिक परिस्थिती किती चांगली असेल तर सुख,शांती नांदत नाही.असे अनेक उदाहरणे आज समाजात दिसतात. जी स्त्री पत्नी होऊ शकत नाही, ती आई झाली तरी मुलांना आई सारखी वागणूक देईल काय?. समाजाला, नातलगांना ते शरीराने एकत्र राहतांना दिसतात पण मनाने एकत्र नसतात.अशी मुलगी पत्नी आणि आई बनली तरी ते सुखी समाधानी विश्व बनलेल्या कुटुंबाला शून्यात आणून ठेवते. पाचवे लक्षण म्हणजे समजदार स्त्री. जी स्त्री प्रत्येक गोष्टीत समजूतदार पणाने घेते व शांत पणे सर्व समजून घेते, जे आहे ते आहे,व जे नाही ते नाही, याचा शांतपणे विचार करून स्वीकार करते तसेच सर्वांशी चांगली वागते,गोड बोलते, त्यामुळे ते घर देखील सुखी व आनंदी असते,ज्या स्त्रीचे बोलणे गोड असते,ती सर्वांशी चांगले बोलून त्यांच्यातील संबंध अधिक चांगले बनवते आणि सर्वांना समजून घेते त्यामुळे वेळ प्रसंगी ते सर्व लोक तिच्या कुटुंबियांसाठी धावून येतात. माझी आई चंद्रकला सागर तायडे तिच्या २७ सप्टेंबर साठाव्या वाढदिवसाच्या निमित्ताने मी माझे मनोगत व्यक्त करतो.माझे बाबा मला नेहमीच लिहण्यास सांगतात, दुसऱ्यावर लिहता येत नसेल तर स्वतःच्या माणसांवर ज्यांच्यावर आपण प्रेम करते ज्यांना आदर्श म्हणतो ते आपल्या शब्दात मांडलेच पाहिजे.हे लिहण्यासाठी त्यांनी मला भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म,भाग चौथा,भगवान बुद्धांची प्रवचने गृहस्थांसाठी, १) सुखी गृहस्थ, २) पुत्रापेक्षा कन्या बरी असु शकते,३) पती आणि पत्नी पान क्रमांक २५३ /२५४, भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म,भाग पाचवा,उपासकांसाठी जीवन नियम (विनय) पान क्रमांक ३०६ ते ३१२,हे वाचून काढण्यास सांगितली.ते वाचून मी हे मनोगत लिहले.मी थोडे शब्द बद्दलले पण त्यांचा अर्थ बदलले नाही.

सर्वात मोठे नातं कोणते असते?.तर ते विश्वास ते परिसरात,नातलंगात आणि ज्याच्याशी आमचे कोणतेही जाती,धर्माचे नातं नाही तरी आम्ही रक्ताच्या नात्यासारखे अनेकांशी जोडल्या गेलो ते केवळ आईबाबांमुळे. म्हणूनच प्रत्येक स्त्रीयांनी मुलगी,पत्नी आणि आई ह्या भूमिका योग्य प्रकारे पारपाडल्या तर त्या शून्यातून विश्व निर्माण करणाऱ्या प्रेरणादायी आदर्श स्त्रिया ठरतात.एक मुलगी,पत्नी आणि आईच्या भूमिका कठीण परिस्थितीत कष्ट,त्याग करून पार पाडणाऱ्या माझा चंद्रकला सागर तायडे आईस साठव्या वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा.आम्हाला असाच प्रेरणादायी लक्षवेधी आशीर्वाद देत रहा.

प्रशांत सागर तायडे,
९८३३८४१३०९,भांडुप,मुंबई

## सांगली: नांदण्यास येत नाही म्हणून तरुणीला विषारी औषध पाजून मारण्याचा प्रयत्न

. या प्रकरणी तरूणीच्या तक्रारीनुसार पती, सासरा व सासू विरूध्द शुक्रवारी रात्री उशिरा मिरज ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नांदण्यास येत नाही या कारणावरून विवाहित तरूणीला बळजबरीने विषारी औषध पाजून मारण्याचा प्रयत्न बेडग ता. मिरज येथे घडला. या प्रकरणी तरूणीच्या तक्रारीनुसार पती, सासरा व सासू विरूध्द शुक्रवारी रात्री उशिरा मिरज ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बेडग माहेर असलेल्या शुभांगी ओमासे (वय २१) या तरूणीचे गावातीलच ऋषीकेश ओमासे यांच्याशी विवाह झाला आहे. काही महिन्यापुर्वी सासरच्या लोकांशी झालेल्या वादावादीमुळे खाडे वस्तीवरील माहेरी आल्या होत्या. शुक्रवारी दुपारी माहेरच्या घरात घुसून पती, सासू व सासरा आणि अन्य एक जण अशा चौघांनी सासरी नांदण्यास का येत नाही या कारणावरून वाद केला. या वादावेळी शिवीगाळ करीत लाथाबुययया‍ने मारहाणही केली. याचवेळी तिघांनी दाबून धरून पतीने गळा दाबत जबरदस्तीने विषारी औषध पाजण्याचा प्रयत्न केला. या प्रकारानंतर तरूणीला माहेरच्या लोकांनी तातडीने उपचारासाठी रूग्णालयात दाखल करण्यात आले. या प्रकरणी पती ऋषीकेश ओमासे, सासू सुमन ओमासे, सासरा श्रीकांत ओमासे व कृष्णा ओमासे या चौघाविरूध्द खूनाचा प्रयत्न केल्या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




## अश्लील हावभावांवर रोष, नागपुरात गौतमी पाटीलवर गुन्हा दाखल होणार

एकता गणेशोत्सव मंडळाने नृत्यांगना गौतमी पाटील हिचा लावणीचा कार्यक्रम आयोजित केला आणि तुफान गर्दी उसळल्याने खुर्च्यांची तोडफोड झाली. त्यामुळे गर्दी पांगविण्यासाठी पोलिसांना सौम्य लाठीमार करावा लागला. नागपूर : गेल्या काही वर्षांपासून नागपुरातील एकता गणेशोत्सव मंडळ आणि वाद याचे समीकरण कायमच आहे. यावर्षीसुद्धा एकता गणेशोत्सव मंडळाने नृत्यांगना गौतमी पाटील हिचा लावणीचा कार्यक्रम आयोजित केला आणि तुफान गर्दी उसळल्याने खुर्च्यांची तोडफोड झाली. त्यामुळे गर्दी पांगविण्यासाठी पोलिसांना सौम्य लाठीमार करावा लागला. त्यामुळे पुन्हा एकदा मंडळाचे नाव चर्चेत आले.राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे माजी आमदार प्रकाश गजभिये यांच्या नेतृत्वात एकता गणेशोत्सव मंडळाच्यावतीने हिलटॉप परिसरात गौतमी पाटील हिच्या लावणीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. मात्र, लहान मैदानावर लावणीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आल्यामुळे पोलिसांवर बंदोबस्ताचा ताण वाढला. तसेच गौतमीच्या लावणीला यावेळी पहिल्यांदाच महिलांची गर्दी उसळली. व्हीआयपी खुर्च्यांच्या मागेच पोलिसांनी बॅरिकेड्स लावल्यामुळे अनेक दर्शकांनी खुर्च्यांवर ऊभे राहून लावणी बघायला सुरुवात केली. काहींनी खुर्च्यांची तोडफोड करून गोंधळ घातला. गर्दीमुळे चेंगराचेंगरीची शक्यता निर्माण झाली. त्यामुळे पोलिसांना काही युवकांवर सौम्य लाठीमार करावा लागला. या प्रकारामुळे कार्यक्रमादरम्यान मोठा



गोंधळ उडाला. गणेशोत्सव मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी थेट हात वर करून पोलिसांकडे बोट दाखवले. या कार्यक्रमात लहान मुले आणि महिला होत्या, त्यामुळे अनेक महिला पोलिसांना महिलांच्या सुरक्षेसाठी स्वतः चा जीव धोक्यात घालून त्यांना सुरक्षा घेराव घालावा लागला. मात्र, मंडळाने कोणतीही जबाबदारी घेण्यास नकार दिला. गौतमीवर गुन्हा दाखल होण्याची शक्यता गौतमी पाटील हिने मंचावरून दर्शकांकडे बघून अश्लील हातवारे आणि इशारे केले. या कार्यक्रमात महिला–तरुणीही मोठ्या प्रमाणात उपस्थित होत्या. त्यामुळे काही एनजीओमधील महिलांनी या प्रकरणी अंबाझरी पोलीस ठाण्यात तक्रार देण्याची तयारी केल्याची माहिती आहे.गजभियेंकडून प्रतिसाद नाही एकता गणेशोत्सव मंडळाच्या कार्यक्रमादरम्यान गोंधळ उडाल्याने झालेल्या पोलिसांच्या लाठीमारामुळे सर्वत्र रोष व्यक्त केला जात आहे. या बाबतीत प्रतिक्रिया जाणून घेण्यासाठी माजी आमदार प्रकाश गजभिये यांना संपर्क केला असता त्यांनी प्रतिसाद दिला नाही.

## डिजेच्या दणदणाटामुळे हृदयावर होतोय गंभीर परिणाम, दोन तरुणांचा मृत्यू; जाणून घ्या काय सांगतात तज्ज्ञ

डिजेच्या कर्कश आणि जोरदार दणदणाटामुळे सांगलीमध्ये दोन तरूणांचा मृत्यू घडल्याची घटना नुकतीच समोर आली आहे. या घटनांमुळे आवाजाचा हृदयावर गंभीर परिणाम होत असल्याचे समोर येत आहे. याबाबत हृदयविकारतज्ज्ञ काय सांगतात जाणून घ्या : डिजेच्या कर्कश आणि जोरदार दणदणाटामुळे सांगलीमध्ये दोन तरूणांचा मृत्यू झाल्याची घटना नुकतीच समोर आली आहे. तासगाव येथे गणेशविसर्जनाची मिरवणूक पाहायला गेलेल्या तरुणाचा डिजेच्या तीव्र आवाजाने हृदयविकाराचा झटका येऊन मृत्यू झाला. शेखर सुखदेव पावशे असे त्या मृत तरुणाचे नाव आहे. काहीच दिवसांपूर्वी त्याला हृदय विकारचं निदान झालं होतं. अँजिओप्लास्टीची शस्त्रक्रिया नुकतीच त्याच्यावर झाली होती. गावात सुरू असलेली गणपतीची विसर्जन मिरवणूक पाहण्यासाठी तो गेला होता. यावेळी डीजे लावण्यात आला होता. रात्रीच्या सुमारास मोठ्या आवाजामुळे त्याला अस्वस्थ वाटू लागलं. त्याच्या छातीत वेदना होत असल्याचे त्याने सांगितल्याने त्याला तातडीने खासगी रुग्णालयात भरती करण्यात आलं. मात्र उपचारांपूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितलं. तर दुसरी



घटना वाळवा तालुक्यातील दुधारी येथे घडली. ३५ वर्षीय प्रवीण शिरतोडेचाही असाच डॉल्बीच्या आवाजामुळे मृत्यू झाला.या दोन घटनांमुळे डीजे किंवा डॉल्बीच्या तीव्र आवाजाचा हृदयावर गंभीर परिणाम होत असल्याचे समोर येत आहे. याबाबत मुंबईतील जसलोक हॉस्पिटलचे हृदयविकारतज्ज्ञ डॉ. हेमंत पाठारे यांनी लोकसत्ताला माहिती देताना सांगितले की जोरदार काणठळ्या बसवणाऱ्या आवाजामुळे हृदयाचे ठोके वाढत असतात. हृदयाची गती वाढते. परिणामी त्याने रक्तदाब वाढतो आणि अशा समारंभातील प्रचंड गर्दीमुळे श्वास घेण्याची समस्या निर्माण होते. या सगळ्या कारणांमुळे ज्यांचे हृदय नाजूक आहे, त्यांना खूप त्रास होतो. परिणामी रक्तवाहिनी (आर्टरी) फाटते, क्लॉट निर्माण होतो आणि मग अशा प्रकारे मृत्यू होण्याच्या घटना घडतात.. तसंच चुकीची जीवनशैली, आपल्या हृदयाबाबतची नाजूक स्थिती जी कदाचित रुग्णाला आधी माहित नसते, तणावपूर्ण आयुष्य, खाण्यापिण्याच्या अनियमित वेळा, स्मोकिंग, तंबाखू, दारूचं व्यसन अशी इतर कारणंही अशा पद्धतीच्या हृदयाचा झटका येण्यासाठी कारणीभूत ठरत असतात. ऐकण्याच्या क्षमतेवर परिणाम – पुढे मोठ्या आवाजावर व्यक्त होताना डॉक्टर पाठारे म्हणतात, की ७० डेसिबल या मर्यादेपर्यंतचा आवाज आपले कान सहन करू शकतात. १०० डेसिबलच्या वरील मर्यादेचा आवाज सतत कानावर पडल राहिल्यास कानाची ऐकण्याची क्षमता कमी होते. परिणामी कानाचा पडदा फाटू शकतो. बहिरेपणा येऊ शकतो. या आवाजामुळे कानाची जी नस आपल्या हृदयाला जोडलेली असते ती स्टिम्युलेट होते. त्यामुळे हृदयाचे ठोके बंद पडू शकतात आणि हार्ट अटॅक येऊ शकतो.

सरकारने त्वरित कारवाई करणे महत्त्वाचे –तसेच गेली २० वर्षे सर्वोच्च न्यायालयात आवाजाविरोधात लढा उठविणाऱ्या सुमायरा अब्दुला यांनीदेखील अती आवाजामुळे हृदयावर होणाऱ्या त्रासाबद्दल आपले स्पष्ट मत मांडले आहे. त्या म्हणतात की आवाजाची मर्यादा न्यायालयाने ठरवलेली आहे. जेणेकरून मनुष्याच्या जीवाला त्रास होणार नाही. यावर सगळे कायदे आहेत. मात्र त्याच्या अंमलबजावणीमध्ये त्रुटी आहेत. माझ्या वीस वर्षाच्या अनुभवाद्वारे सांगायचं झालं तर आधीपेक्षा आवाजाच्या या समस्येचे सध्या प्रमाण कमी झालेले आहे. सणसमारंभात मात्र याचा अजूनही अतिरेक झालेला दिसून येतोच. यासाठी लोकांमध्ये या अती आवाजामुळे शारीरिक आणि मानसिक स्वरूपाचे जे भयंकर स्वरूपात त्रास होतात, याबाबत भान येणं महत्त्वाचं आहे. याविषयी आणखीन लोकांमध्ये जागरूकता निर्माण होणे गरजेचे आहे. तसेच जिथे गरजेचं आहे तिथे सरकारने त्वरित कारवाई करणं अत्यंत महत्त्वाचं आहे, असं त्या नमूद करतात.

## आयुर्वेदाच्या स्मृतीतून: बहुगुणी 'नतुराल क्रिस्टल'

रशियन भाषेत नॅचरल चा उच्चार 'नतुराल' असा करतात. तेथील रुग्ण मला म्हणाला की तुमचा तो 'नॅचरल क्रिस्टल सोप' तर फारच छान आहे. कुतूहलापोटी मी त्याला तो आणून दाखवायला सांगितला. कुतूहल वाढत चाललं होतं, काय असेल कळत नव्हतं एवढं महाग? आयुर्वेद ही भारताची एक ओळख! संपूर्ण जगाकडे जे नाही ते भारताकडे आहे. ते ज्ञान म्हणजे आयुर्वेद. त्यामुळे हे शिकण्यासाठी ज्याप्रमाणे जगभरातून लोक आज भारताकडे येत आहेत, त्याचप्रमाणे कित्येक वैद्य वेगवेगळ्या देशांमध्ये आयुर्वेद प्रचार कार्यासाठी जात आहेत. त्यांना सर्व प्रगत देशांकडून आग्रहाचे निमंत्रण मिळत आहे. मलासुद्धा गेली ७–८ वर्षे रशियामध्ये आयुर्वेद शिकविण्यासाठी जायची संधी मिळाली. मात्र, प्रत्येक वेळी मीच काही तरी शिकून येतोय की काय असे मला वाटते. कारण आपण जेवढा आयुर्वेद वापरत नाही त्यापेक्षा थोडा जास्त आपलाच आयुर्वेद रोजच्या वापरात वापरणारे लोक मला तिथे भेटले.एकदा एका रुग्णाशी सहज गप्पा मारत बसलो होतो तर तो मला तो रोज वापरत असलेल्या भारतीय बाजारपेठेतील काही आयुर्वेदिक वस्तूंची माहिती सांगायला लागला. आयुर्वेदिक टूथपेस्ट, साबण, तेल असे सांगून झाल्यावर तो मला म्हणाला की तुमचा तो 'नॅचरल क्रिस्टल सोप' तर फारच छान आहे. रशियन भाषेत नॅचरल चा उच्चार 'नतुराल' असा करतात त्यांच्या भाषेत ऐकायला फार छान वाटतं. असो. तो म्हणाला, 'आमच्याकडे ज्यांना ज्यांना या सोपचा अनुभव आला आहे ते सर्वजण हाच वापरतात. फारच सुंदर आहे हा. या मुळे घामाची दुर्गंधी बिलकूल येत नाही. कोणतेही त्वचाविकार असतील तर याच्या नियमित वापरणे ते पटकन बरे होतात, एवढंच नव्हे तर मासिक पाळीच्या काळात या सोपने अंघोळ केल्यास कोणताही जंतुसंसर्ग होत नाही. हा उत्तम जंतुघ्न आहे. जखम तर फार पटकन भरते, आम्ही काही लागलं, कापलं तर प्रथम यानेच स्वच्छ धुवून घेतो. रक्तस्त्रावसुद्धा लगेच थांबतो. आता तर इथे सर्व पुरुषमंडळी दाढी केल्यानंतर आफ्टर शेवऐवजी हाच 'नतुराल क्रिस्टल' वापरतात. थोडा महाग आहे पण छान आहे. कुतूहलापोटी मी त्याला तो आणून दाखवायला सांगितला. सायंकाळी तो रुग्ण साबण घेऊन आला. सुंदर बांबूच्या काड्यांच्या वेष्टनात फार आकर्षक पॅकिंग केलेले होते. साधारण २० ग्रॅम साबणाची किंमत ४०० रुबेल म्हणजे ८०० रुपये होती. म्हणजे १ किलोची किंमत ४० हजार रुपये. असो. कुतूहल वाढत चाललं होतं, काय असेल कळत नव्हतं एवढं महाग, एवढं गुणकारी आणि तेही भारतीय? आयुर्वेदिक? म्हणून पटकन उघडून पाहिलं. तो आपल्या तुरटीचा खडा होता.मी खरोखरच चकित झालो. काय सांगावं कळेना. त्याने तुरटीचे सर्व गुण अगदी बरोबर सांगितले होते. आणि आमच्या लहानपणी आमच्या घरी पण हाच वापरला जायचा. अगदी पूर्वी भारतीयांच्या प्रत्येक घराघरांत तुरटीचा एक खडा तरी अवश्य मिळायचा. सर्व पुरुष मंडळी दाढी केल्यावर तर हमखास लावायची. कापलं, लागलं की आमच्या लहानपणीचे हुकमाचे औषध होते ते. माझे विचारचक्र सुरू झाले. आम्ही विसरून गेलेल्या आमच्याच एका सवयीची व औषधाची आठवण त्याने करून दिल्याबद्दल मनातून त्याचे आभार मानले. हे असेच चालू राहिले तर काही काळाने हीच मंडळी आपल्याला आयुर्वेद शिकवतील आणि आपल्याकडे अगदी अजूनही १००–१५० रुपये किलोने मिळणारी तुरटी आपल्याला ४० हजार रुपये किलोने विकतील आणि आपणही ती आनंदाने घेऊ. कारण तेव्हा ती आपली 'तुरटी' नसेल. ती रशियन 'नतुराल क्रिस्टल' असेल.महागडे डीओ लावून घामाची दुर्गंधी घालवण्यापेक्षा एकदा तरी तुरटी लावून पाहा किती छान वाटते. आफ्टर शेवसाठी सर्वोत्तम. खरंच घरातल्या घरात काही जखम झाली, कापलं किंवा खरचटलं की लगेच तुरटीच्या पाण्याने स्वच्छ धुवून घ्या. जखम पटकन भरून येते व जंतुसंसर्ग पण होत नाही. सततची सर्वांगाची, योनीत, जांघेत खाज सुटत असेल तर तुरटीच्या साबणाने अंघोळ करा. खाज पटकन थांबते. त्वचारोग असणाऱ्यांनी तर आवर्जून या साबणाचा वापर करावा. दातातून, हिरड्यातून रक्तस्त्राव होत असल्यास अथवा दाढ दुखत असल्यास तुरटीच्या पाण्याच्या गुळण्या कराव्यात व तुरटीच्या लाहीचे चूर्ण मध व तुपात कालवून दिवसातून दोन ते तीन वेळा लावावे. तत्काळ उपशय मिळतो.




## लिंबू सरबत प्यायल्याने किडनी स्टोन विरघळून लघवीमार्गे बाहेर पडतो? तुमची किडनी सुदृढ आहे का कसे ओळखाल?

घळवपशू डींपशी: लिंबाच्या सरबतामुळे मुतखडा विरघळून लघवीवाटे शरीरातून बाहेर पडतो असे अनेकजण सांगतात पण यात किती तथ्य आहे, याविषयी डॉ दिनेश कुमार टीपी, सल्लागार, युरोलॉजी, एंड्रोलॉजी आणि किडनी ट्रान्सप्लांट सर्जन, मणिपाल हॉस्पिटल बंगळुरू सांगतात की युरिक ऍसिडची वाढती पातळी, जीवनशैलीतील घातक सवयी यामुळे किडनी स्टोन म्हणजेच मुतखड्याचा त्रास आता अगदी कॉमन झाला आहे. कोणत्याही वयोगातील व्यक्तीला हा त्रास जाणवू शकतो. जितका आजार सामान्य होतो तसेच त्याचे उपचारही वेगवेगळ्या पद्धतीने समोर येत असतात. अलीकडे आजरांचे निदान ते उपचार सगळ्यांसाठीच ऑनलाईन स्रोत उपलब्ध आहेत. किडनी स्टोन सुद्धा याला अपवाद नाही, अनेक सोशल मीडिया साईट्स व सर्च इंजिन प्रश्नांमध्ये किडनी स्टोनचे उपचार शोधले जातात. अशावेळी एक सल्ला हल्ली बराच व्हायरल होत आहे तो म्हणजे किडनी स्टोनवर लिंबू पाणी प्रभावशाली ठरते. लिंबाच्या सरबतामुळे मुतखडा विरघळून लघवीवाटे शरीरातून बाहेर पडतो असे अनेकजण सांगतात पण यात किती तथ्य आहे हे आपण आज डॉक्टरांकडून जाणून घेणार आहोत.लिंबू सरबत तुमच्या किडनी स्टोनचा त्रास कमी करू शकते का? डॉ दिनेश कुमार टीपी, सल्लागार, युरोलॉजी, एंड्रोलॉजी आणि किडनी ट्रान्सप्लांट सर्जन, मणिपाल हॉस्पिटल बंगळुरू यांनी इंडियन एक्सप्रेसला सांगितले की, लिंबूवर्गीय फळांच्या रसामध्ये व्हिटॅमिन सी जास्त असते, जे एक अँटिऑक्सिडेंट आहे, तर पोटॅशियम आणि मॅग्नेशियम मुळे मुतखडे तयार होण्यास प्रतिबंध घालता येतो. शिवाय लिंबूवर्गीय पेय (लिंबाचे सरबत, संत्री–मोसंबी ज्यूस, इत्यादी) लघवीमध्ये सायट्रेटचे प्रमाण वाढवते. हे सायट्रेट शरीरातील ऑक्सलेटशी जोडले जाऊन मुतखडे तयार होण्याचे प्रमाण कमी होऊ शकते.

## थायरॉईड ग्रंथी आणि मनाचा संबंध

क्शरश्रींह डशिलळरश्र: थायरॉईडचे विकार आणि डिप्रेशन, चिंता अशा मानसिक विकारांची लक्षणे खूप सारखी असतात. त्याचबरोबर हायपोथायरॉईडीझममध्ये डिप्रेशनचे प्रमाण जास्त आढळते. अनेक शारीरिक व्याधींचा आत्तापर्यंत आपण मागील काही लेखांमध्ये मानसिक समस्यांशी आणि मानसिक स्थितीशी असलेला संबंध पहिला. आपल्या शरीरातील अंतर्द्रव्ये निर्माण करणाऱ्या ग्रंथीही (endocrine glands) आजारांना कारणीभूत असतात; जसे थायरॉईड ग्रंथी आणि त्यांचे विकार. आज थायरॉईड ग्रंथीच्या विकारांचा आणि मनाचा काय संबंध ते पाहू.थायरॉईडचे दोन प्रकारचे आजार असतात. थायरॉईड ग्रंथी आपल्या गळ्यात समोरच्या बाजूला असते. ती Triiodothyronin(T3) Am{U Thyroxin(T4) अशी दोन अंतर्द्रव्ये निर्माण करते. मेंदूतील Hypothalamus, Pituitary gland असे भाग काही अंतर्द्रव्ये उदा. Thyroid stimulating hormone(TSH) निर्माण करतात, ज्यांच्या आधारे थायरॉईड ग्रंथीचे कार्य नियंत्रित केले जाते. जेव्हा ढडक चे प्रमाण वाढते आणि T4/T3 यांचे प्रमाण कमी होते तेव्हा त्यास प्रत्यक्ष थायरॉईड ग्रंथी कमतरता(Overt Hypothyroidism) आणि जेव्हा ढडक चे प्रमाण जास्त, परंतु T4/T3 यांचे प्रमाण नॉर्मल राहते तेव्हा त्याला अप्रत्यक्ष थायरॉईड ग्रंथी कमतरता (subclinical hypothyroidism) असे म्हणतात. जेव्हा TSH कमी प्रमाणात निर्माण केले जाते आणि T4 चे प्रमाण वाढते, तेव्हा त्याला थायरॉईड ग्रंथीचे अतिप्रमाणात स्त्रवणे(Hyperthyroidism) म्हणतात. या दोन्हीचा मानसिक स्थितीवर परिणाम होतो आणि मानसिक विकारांचा थायरॉईड ग्रंथीच्या कार्यावर काही प्रमाणात परिणाम झालेला दिसून येतो. ३२ वर्षांची श्रुती गेले काही महिने अतिशय थकलेली दिसायची. घरातले काम काही तिच्याने उरकायचे नाही. दुपार उलटून जायची सगळी झाकपाक करताना. कामाचा वेग अत्यंत कमी झाला होता. कशात उत्साह वाटत नसे. पटकन रडू यायचे. काही करताना लक्ष लागत नसे, पटकन विसरायला व्हायचे. मग घरच्या कामात चुका होत. कोणी काही निरोप दिला तर तो ती विसरून जायची. कधी कधी एखादे महत्त्वाचे काम विसरायची आणि मग तिला फार अपराधी वाटायचे. मुलांशीसुद्धा बोलावेसे वाटत नसे. घरातल्या सगळ्यांना वाटले की तिने वर्षापूर्वी नोकरी सोडली, त्याचेच तिला आता टेन्शन आले आहे. तिने स्वतः घेतलेला निर्णय असला तरी आता बहुधा तिला नोकरी सोडल्याचा पश्चात्ताप होत असावा, असे वाटून तिला त्यांनी मनोविकारतज्ज्ञाकडे नेले. तिची लक्षणे सगळी डिप्रेशनची होती. तिला त्यानी औषध दिले. तीन महिने झाले गोळ्या घेऊन, तरी लक्षणांमध्ये काही सुधारणा होई ना! डॉक्टरांनी थायरॉईडचा तपास करायला सांगितला. Hypothyroidism चे निदान झाले. त्याचे उपाय सुरू झाले. डिप्रेशनचे औषध सुरूच होते. हळूहळू श्रुतीची तब्येत सुधारू लागली, कामाला वेग आला आणि मनात उत्साह आला. ३५ वर्षांचा अभय हल्ली सारखा घामाघूम होई. ऑफिसला जाताना कसली तरी अनामिक भीती त्याला वाटे. छातीत धडधडू लागे. लिहायला बसला की हात थरथरत. काय होते आहे आपल्याला, असे त्याला वाटे. नुकतेच प्रमोशन मिळाले होते, जबाबदारी वाढली होती, टीम लीडर झाला होता. त्या वाटले आपल्याला त्याचेच टेन्शन आलेले दिसते आहे. त्याने सरळ एका मानसोपचारतज्ज्ञाचा सल्ला घेतला, थेरपी सुरू झाली. एकीकडे त्याच्या लक्षात आले, कितीही खाल्ले तरी वजन कमी होत चालले आहे. हे काहीतरी वेगळे आहे, असे जाणवले आणि तो आपल्या डॉक्टरांना भेटला.

# गाथा मुक्तीसंग्रामाची नाटकाचे प्रयोग होणार लातूर जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात

## शुभारंभाचा प्रयोग लातूरात १ आक्टोबरला

लातूर – मराठवाडा मुक्ती दिनाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त ॲड. शैलेश गोजमगुंडे व डॉ. सतीश साळुंके लिखीत गाथा मुक्ती संग्रामाची हे नाटक लातूर जिल्ह्यातील सर्व तालुक्यात होणार आहे. राज्य सरकारच्या सांस्कृतिक संचालनालयाची निर्मिती असलेल्या या नाटकाचा शुभारंभाचा प्रयोग लातूरमध्ये १ आक्टो. २०२३ रोजी, सायं. ६ वाजता मार्केट यार्डातील नाट्यगृहात होणार आहे.

तर दि. २ आक्टो. जळकोट, ३ आक्टो. देवणी ४ आक्टो. निलंगा ५ आक्टो. चाकूर ६ आक्टो. रेणापूर ७ आक्टो. अहमदपूर ८ आक्टो. उदगीर ९ आक्टो. औसा १० शिरुर अनंतपाळ आदी तालुक्यात होणार आहे. या नाटलाचे दिग्दर्शन शैलेश गोजमगुंडे यांनी केले असून प्रकाश योजना सुधीर राजहंस, नेपथ्य बालाजी म्हेत्रे, संगीत दयानंद सरपाळे, रंगभूषा – वेशभूषा सचिन उपाध्ये यांची आहे.

तर प्रमुख भूमिका तुकाराम सुवर्णकार, रवी आघाव, अनिल पवार, ज्योतिबा बडे, अभय कांबळे, आकाश कुलकर्णी, सुवर्णा बुरांडे, हिरा वेदपाठक, बालाजी म्हेत्रे, लखन कांबळे, सुरेंद्र अपसिंगेकर, रणजीत आचार्य, महेश पवार, सुरेश गीर, रवी सावंत, डॉ. नागोराव बोरगावकर, शरीफ पठाण, पृथ्वीराज चव्हान, प्रज्ञा मुळे, यशोदीप कांबळे, ऋतुराज सुरवसे, अभिजीत भड, सागर शिंदे, रामी रेड्डी, परमेश्वर इंगळे, कन्हैय्या पाटील आदी साकारणार आहेत.

तब्बल ३० कलावंतांचा संच असलेल्या या नाटकात रझाकारांनी केलेल्या अन्यायाचं आणि त्याविरुद्ध हौतात्म्य पुकारलेल्या स्वातंत्र्यसेनानींच्या संघर्षाची कथा नाट्यरुपात मांडलेली आहे. दुर्लक्षित राहिलेला इतिहास समाजासमोर मांडण्याचा हा प्रयत्न आहे. या नाटकाचा अधिकाधिक लोकांनी लाभ घ्यावा असे आवाहन सांस्कृतिक संचालनालयाचे संचालक बिभीषण चवरे शैलेश गोजमगुंडे, डॉ. दिपक वेदपाठक आदींनी केले आहे.

# पारदर्शकता,सभासदाचा विश्वास हेच पतसंस्थेच्या यशाचे गमक: प्राचार्य अरूण कदम

लातूर: विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रूग्णालय कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या कामाची पारदर्शकता आणि सभासदांचा विश्वास हेच पतसंस्थेच्या यशाच गमक असल्याचे प्रतिपादन नर्सिंग कॉलेजचे प्राचार्य अरुण कदम यांनी केले. लातूर: विलासराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालय आणि रूग्णालयातील कर्मचारी सहकारी पथसंस्थेच्या २१व्या वार्षीक बैठकीत हॉटेल उत्सव द रूफ टॉप उषाकिरण कॉम्पलेस दयानंद कॉलेजच्या समोर बार्शी रोड येथे आयोजित बैठकीत अरूण कदम हे प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी मंचावर प्रमुख पाहुणे पत्रकार डॉ, सितम सोनवणे, प्रा.दामोधर मुंडे, कर सल्लागार सुमीत बंदखडके, सहकार प्रशिक्षण केंद्राचे प्रा.सचिन देशमुख , संस्थेचे चेअरमन संभाजी केंद्रे , सचिव देवकत्ते भागवत आदी मान्यवर उपस्थित होते. प्राचार्य अरूण कदम पुढे म्हणाले संचालक मंडळ, सदस्य आणि पथसंस्थेचे कर्मचारी यांच्यात समन्वय आसल्यास पथसंस्थेची वाटचाल योग्य दिशेने होते. पथसंस्था चांगली चाली तरच सदस्यांना वेळोवेळी आर्थिक मदत होते.संचालक मंडळाच्या कामाचे कौतुक करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



या बैठकीत पत्रकार डॉ.सितम सोनवणे, प्रा.दामोधर मुंडे, कर सल्लागार सुमीत बंदखडके, सहकार प्रशिक्षण केंद्राचे प्रा.सचिन देशमुख संस्थेचे चेअरमन संभाजी केंद्रे यांनी यावेळी मार्गदर्शन केले. या बैठकीत चेअरमन संभाजी केंद्रे, व्हाईस चेअरमन निशा जाधव, सचिव भागवत देवकत्ते,संचालक अनंत पवार,सुग्रीव गोरे,चंद्रशेखर जाधव, शरद चव्हाण,तसेच संचलिका सौ गुडसुरे बालिका , श्रीमती चितळकर चंदा, श्रीमती भाग्यश्री वाघमारे, श्रीमती निशा दळवी तसेच माजी संचालक आंबेकर आणि माजी संचालिका गाडेकर सेवानिवृत्त कर्मचारी जाधव मीना .आदी मान्यवरांचा सत्कार यावेळी करण्यात आला. संस्थेच्या संचालिका वाघमारे भाग्यश्री यांनी मागील वर्षातील दिवगत सभासद, सैनिक, थोर महापुरुष तसेच यांना भावपूर्ण श्रद्धांजली चेअरमन संभाजी केंद्रे यांनी नफातोटा पत्रक सादर केला. डेव्हीडदड वाटप व्याजदराची सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमाच्या प्रारंभी दिप प्रज्वलन आणि धन्वंतरी चे प्रतिमा पुजन प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि सभेपुढील विषयाचे वाचन संस्थेचे सचिव भागवत देवकत्ते यांनी तर सूत्रसंचालन जिल्हा परिषद शिक्षक महेश पवार यांनी केले. तर बालिका गुडसूरे यांनी अभार मानले.

# एमआयडीएसआर दंत महाविद्यालयाच्या एकदंत '२३ कार्यक्रमात भारतीय संस्कृतीचे दर्शन

लातूर, दि. ३० – लातूर येथील एमआयडीएसआर दंत महाविद्यालयात गणेशोत्सवानिमित्त गुरुवार, दि. २८ सप्टेंबर रोजी आयोजित एकदंत '२३ या कार्यक्रमात विविध विभागातील शिक्षक कर्मचाऱ्यांनी रॅम्प वॉक व्दारे सादर केलेल्या विविध कलाकृतीतून भारतीय संस्कृतीचे दर्शन घडून आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून दंतरोग तज्ञ डॉ. शामसुंदर सांगळे, भूल तज्ञ डॉ. आरती झंवर या उपस्थित होत्या. व्यासपीठावर प्राचार्य डॉ. सुरेश कांगणे, उप प्राचार्य डॉ. यतीशकुमार जोशी, सांस्कृतीक समिती अध्यक्ष डॉ. वर्षा सांगळे, कार्यालय अधिक्षक बळीराम हांडगे यांची प्रमुख उपस्थिती होती. विश्वशांती प्रार्थना आणि मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन करुन कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. यानंतर घेण्यात आलेल्या रॅम्प वॉक मध्ये एमआयडीएसआर दंत महाविद्यालयातील दंत व्यंगोपचार शास्त्र विभागातील शिक्षकांच्या चमुने 'भारतीय संस्कृती' या विषयावर सादरीकरणातून भारतातील विविधतेचे दर्शन घडवून आणले. त्याचबरोबर कृत्रिम दंत शास्त्र विभागातील



चमुच्या सादरीकरणातून 'महाराष्ट्र संस्कृती' चे दर्शन झाले. तसेच दंत शल्य चिकित्सा शास्त्र विभागातील चमुच्या सादरीकरणातून सबंध भातीय सिनेसृष्टीची ओळख झाली. त्याचप्रमाणे मुख शल्य चिकित्सा शास्त्र विभागातील चमुने राजस्थानमधील राजपूत संस्कृतीचे सादरीकरण केले तर दंत परी वेष्टन शास्त्र विभागातील चमुने चांद्रयान मिशनच्या यशस्वीतेचे सादरीकरण केले, पॅथॉलॉजी विभातील चमुने मास्क रेड या विषयावर सादरीकरण केले, बाल दंत रोग शास्त्र विभागाच्या चमुने 'भारतीय – पाश्चिमात्य सिनेसृष्टी' यावर सादरीकरण केले तर मुख वैद्यकशास्त्र विभातील चमुने 'कॉर्पोरेट इन मल्टी नॅशनल' या विषयावर सादरीकर करुन उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. त्याचबरोबर कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड व सर्व विभाग प्रमुख यांनी रॅम्पवॉक करत उपस्थितांची मने जिंकली. यावेळी फिशपॉण्ड व रोज डे चे सादरीकरण झाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आजमी व मृणाल यांनी केले. फॅशन शोचे जास्मीन फरास, प्रज्ञा वाघमारे यांनी सूत्रसंचालन केले तसेच रोज डे कार्यक्रमाचे प्रिती चेंडकाळे, नम्रता भोसले यांनी सूत्रसंचालन केले. शेवटी आभार डॉ. वर्षा सांगळे यांनी मानले.

# कांदिवलीत जशने ईद-ए-मिलादुन्नबी जल्लोषात साजरा. वंचित बहुजन युवा आघाडी तर्फे पाणी वाटप.

मुंबई/ शहामत शेख. जगाला शांती सद्भावना प्रेम व बंधुभावचा संदेश देणारे इस्लाम धर्माचे प्रेषित हजर मोहम्मद पैगंबर (स.अ ) यांचा जन्मदिवस अर्थात ईद–ए–मिलादुन्नबी कांदिवलीत दामू नगर शुक्रवार (दि.२९.) अद्भुत पूर्व जल्लोषात साजरा करण्यात आला.या जुलूस मार्गावर जागोजागी थंडपेय,सरबत व पाणी मुस्लिम बांधवा तर्फे वाटप करण्यात आले.तसेच विविध धार्मिक कार्यक्रम आयोजन करून भव्य जुलूस काढण्यात आल्याने हजारो संख्येने यामध्ये मुस्लिम बांधवांनी सहभाग घेतला. वंचित बहुजन युवा आघाडीच्या वतीने उत्तर मुंबई जिल्हा युवा सचिव व पत्रकार शहामत शेख यांच्या पुढाकाराने तसेच वंचित बहुजन आघाडी उत्तर मुंबई जिल्हा अध्यक्ष प्रकाश आहिरे यांच्या उपस्थित पाणी वाटप करण्यात आले.जश्ने ईद–ए–मिलाद निमित्त विभागात आकर्षण लाईट व पताकाने ठीकठिकाणी सजावट करण्यात आले,ही जुलूस लक्ष्मी नगर येथून सायकाळी सात वाजता सुरुवात करण्यात आले.नारे ए तकबिर अल्ला हू अकबर,हुजूर का दामन नही छोडेंगे यासह घोषणा देत मुस्लिम बांधवांमध्ये उत्साह दिसला.पांढरे शुभ्र कपडे पेहराव व हातात झेंडा लेहरत लहान मुलासहित मुस्लिम बांधव या जुलूस मध्ये सहभाग घेतला. टिपू सुलतान ग्रुपच्या वतीने दामू नगर विभागात




खीर वाटप करण्यात आले.लक्ष्मीनगर दामू नगर,लोखंडवाला सर्कल,हनुमान नगर,वडारपाडा असा मार्ग कर्मस्थ करत वडारपाडा कब्रस्थान येथे दुवा फातिया करत जुलूसचे सांगता करण्यात आले. या मार्गावर पोलिसांचा बंदोबस्त तैनात होता.

# लातूर जिल्हा ग्रामसेवक कर्मचारी सहकारी पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा सपन्न

लातूर– ३० /९ /२०२३ रोजी लातूर जिल्हा ग्रामसेवक कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादित लातूर ता.जी. लातूर ची २४ वार्षिक सर्वसाधारण सभा चेअरमन श्री रणजीत रामराव शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली पंचायत समिती सभागृह लातूर येथे ठीक १२ वाजता खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली




सर्वप्रथम दिनांक ३० सप्टेंबर १९९३ रोजी लातूर जिल्ह्यातील किल्लारी येथे झालेल्या महाप्रलयंकारी भूकंपात मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांना व अहवाल वर्षात दीर्घ आजाराने निधन झालेले ग्रामसेवक सभासद कै. विकास रतन कोहाळे यांना दोन मिनिटाचे मौन बाळगून भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली नंतर पतसंस्था सभासदांपैकी पदोन्नती झालेले श्री विष्णू कुंभार व श्री भगवान ननंदकर ,सेवानिवृत्त झालेले सभासद श्री कांतीलाल खडबडे व गोविंद जाधव व गुणवंत पाल्यापैकी श्री आत्माराम भुसे,व्यंकट लोणीकर व सुलोचना ढोबळे यांचा चेअरमन, व्हा. चेअरमन, सचिव व संचालक मंडळ यांच्या वतीने सत्कार करण्यात आला तसेच ३१ मार्च २०२३ अखेरच्या तेरीज पत्रक, नफा तोटा व ताळेबंद पत्रकाचे वाचन करणे,३१ मार्च २०२३ च्या अंदाजपत्रकापेक्षा कमी अधिक खर्च मान्यता घेणे, २२–२३ च्या नफा व नफ्याचे नियोजन व लाभांश वाटप करण्यास मंजुरी घेणे, पतसंस्थेच्या व्याजदराच्या निश्चितीबाबत, दोष दुरुस्ती अहवाल सादर करणेबाबत, लेखापरीक्षकाची नेमणूक करणे बाबत सेवानिवृत्त सभासदांना सभासद ठेवीचे व्याजदर वाढविणे व उपविधी पोट नियम क्रमांक १–३ मध्ये दुरुस्ती करण्यासंबंधी विषयावर सविस्तर चर्चा करून सर्व ठराव मंजूर करण्यात आले

सभेस व्हाईस चेअरमन श्री विठ्ठल जनार्दन चोथवे, सचिव श्री विष्णु भागवतराव भिसे, संचालक श्री आशिष निरूडे, श्री विष्णू कुंभार, श्री हनुमंत चलमले, श्री सुधीर थडकर, सौ जयश्री तोडकर व जिल्ह्यातील ग्रामसेवक ग्रामविकास अधिकारी सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते अगदी खेळीमेळीच्या वातावरणात २४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा पार पडली ३१ मार्च २०२३ रोजी संपणाऱ्या २४ व्या सहकारी वर्षाचा वार्षिक अहवाल सन २०२२ २३ मध्ये पतसंस्थेला सर्व खर्च वजा जाता रक्कम रुपये ३०१३९३१ इतका निव्वळ नफा झाला आहे त्यावर लाभांश वाटप १०% इतक्या दराने सभासदांना त्यांच्या खात्यावर वर्ग करणार असे ग्रामसेवक पतसंस्थेचे सचिव श्री विष्णू भागवतराव भिसे यांनी सांगितले

# हद्दच झाली...! आता तहसीलदार पदच कंत्राटी भरले जाणार

नागपूर : जिल्हाधिकारी जळगाव, सक्षम प्राधिकारी जळगाव, उप विभागीय अधिकारी भूसावळ, अमळनेर, पाचोरा, चाळीसगाव आदी भागांमध्ये सहा महिन्यांकरीता सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांची विविध पदांवर पदभरती केली जाणार आहे. याची जाहिरात समाज माध्यमांवर फिरत असून यानुसार आता सहा महिन्यांसाठी कंत्राटी पद्धतीने तहसीलदार पदावर भरती केली जाणार आहे. तहसीलदारासारखे महत्त्वाचे पद कंत्राटी पद्धतीने भरले जाणार असल्याने हा चर्चेचा विषय ठरला आहे. ही जाहिरात जिल्हाधिकारी कार्यालय जळगाव यांनी प्रकाशित केली आहे. त्यानुसार तहसीलदार, कारकून किंवा मंडळ अधिकारी या पदांवर कंत्राटी भरती केली जाणार आहे. यासाठी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनाच प्राधान्य दिले जाणार आहे. तहसीलदार पदासाठी ४० हजार रुपये मानधन तर कारकून पदासाठी २५ हजार रुपये मानधन राहणार आहे. यासाठी शैक्षणिक अर्हता आणि विविध नियम दिले आहेत. मात्र, शासनाने बाह्ययंत्रणेच्या माध्यमातून कंत्राटी भरती करण्याचा निर्णय घेतल्यावर आधीच तरुणांमध्ये रोष असताना आता तहसीलदार पदच कंत्राटी भरले जाणार असल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

# आमदार शेखर निकम यांच्या उपस्थितीत उजगाव (सुतारवाडी) ग्रामस्थांनी केला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये प्रवेश

चिपळुण/ प्रतिनिधी: शेखर निकम यांनी आमदार झाल्यासून प्रत्येक गावात नियोजनबद्ध अशी विविध विकास कामे केली आहेत. त्यामुळे त्यांनी जनतेच्या मनात एक वेगळीच छाप निर्माण केली आहे. कला, क्रीडा, पर्यटन, शिक्षण, उद्योग व ग्रामिण भागातील विविध विकास कामे करत तसेच बरेचसे प्रलंबीत प्रश्न अधिवेशनामध्ये मांडून जनतेला न्याय मिळवून दिला आहे. कार्यसम्राट आमदार यांच्या कार्यपद्धतीवर विश्वास ठेवून उजगाव सुतारवाडी येथील ग्रामस्थांनी सावर्डे येथे जनसंपर्क कार्यालयात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी मध्ये जाहीर प्रवेश केला आहे यामध्ये किरण पांचाळ, अध्यक्ष सुरेश पांचाळ, कृष्णा पांचाळ, रामचंद्र पांचाळ, रमेश पांचाळ, सुनील पांचाळ, मुकुंद पांचाळ, प्रमोद पांचाळ, चंद्रकांत पांचाळ, यशवंत पांचाळ, अनंत पांचाळ, रवींद्र पांचाळ, विनोद पांचाळ, परेश पांचाळ, प्रभावती पांचाळ, पूर्वा पांचाळ,




रोशनी पांचाळ, निशा पांचाळ, वनिता वाझ्ये, सुहासिनी पांचाळ, अशोक पांचाळ, शुभम पांचाळ, महेंद्र पांचाळ, नथुराम पांचाळ, प्रकाश पांचाळ, राजेश पांचाळ याचा समावेश आहे. या प्रवेशकर्त्यांचे आमदार शेखर निकम यांनी आभार मानले व राष्ट्रवादी पक्षामध्ये स्वागत केले. आमदार शेखर निकम यांनी ग्रामस्थांना पक्षप्रवेशावेळी म्हणाले की, पक्षांर्गत कामे करताना संघटीत होवून कामे करा पक्ष संघटना बळकट करण्याचा निर्धार करा. विकास कामांची, निधीची तुम्ही चिंता करु नका ती माझी जबाबदारी राहील असा शब्द आमदार निकम यांनी उजगाव सुतारवाडी ग्रामस्थांना दिला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस प्रदेश सचिव जयंत शेठ खताते,जिल्हा नियोजन सदस्य दादा साळवी, दिनेश शिंदे, अनंत कोकरे, अमित जाधव, योगेश सावंत, सुनील बडद, संतोष बडद, पप्पू गोवळकर इ. पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# 'घड्याळा'साठी निवडणूक आयोगात ६ ऑक्टोबरला सुनावणी

मुंबई : राष्ट्रवादी फुटीसंदर्भात ६ ऑक्टोबरला निवडणूक आयोगात सुनावणी घेण्यात येणार आहे. शरद पवार गट अजित पवारांच्या शिवसेनेच्या फुटीबाबत अजित पवारांनी केलेल्या वक्तव्यांचा आधार घेत शरद पवार गट निवडणूक आयोगात बाजू मांडण्याची शक्यता आहे. यामुळे आता अजितदादांच्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता आहे..

विरोधी पक्षनेते असताना एका पत्रकार परिषदेत शिवसेनेत पडलेल्या फुटीबाबत म्हणाले होते. या संदर्भातील योग्य निर्णय आला नाही तर देशातील छोट्या पक्षांवर त्याचा परिणाम होईल. उद्या देशातील छोट्या पक्षांचे प्रतिनिधी काही कारणास्तव वेगळे झाले तर संबंधित पक्षावर ते दावा करतील उदा. राज ठाकरे यांच्या पक्षाचा केवळ एकच आमदार आहे. पुढे जाऊन त्यांनी वेगळी भूमिका घेतली तर तो पक्ष संबंधित आमदारांचा समजायचा का? असे अजित पवार म्हणाले होते.

शरद पवारांनी निवडणूक आयोगाला दिलेल्या उत्तरात अनेक महत्त्वाच्या बाबी मांडल्या आहेत. एकनाथ शिंदे यांनी ज्यावेळी बंड केले त्यानंतर अजित पवार विरोधी पक्षनेते म्हणून काम पाहत होते. त्यावेळी अजित पवारांनी शिंदेवर टीका केली होती. आता शरद पवार गट याच वक्तव्याचा आधार घेत अजित पवारांच्या अडचणीत वाढ करण्याची शक्यता आहे. शरद पवार गटाने नऊ मंत्र्यांविरोधात शरद पवार गटाने याचिका दाखल केलेली आहे. मात्र या नऊ मंत्र्यांशिवाय ३१ आमदारांच्या विरोधातही अपात्रतेची याचिका दाखल करण्यात आलेली आहे. याशिवाय अजित पवार गटाने केलेले दावे देखील शरद पवार गटाने फेटाळले आहेत. २०२२ मध्ये जी राष्ट्रीय कार्यकारिणी झाली त्याचे देखील दाखले देण्यात आले आहेत. त्या प्रक्रियांचे पालन करत माहिती निवडणूक आयोगात दिली होती.

अजित पवार गटाने केलेले सर्व दावे फेटाळले

राष्ट्रवादी पक्ष आणि चिन्हाचा वाद निवडणूक आयोगात पोहोचला असून त्याबाबत ६ ऑक्टोबरला सुनावणी होणार आहे. अजित पवार गटाच्या वतीने दाखल करण्यात आलेल्या याचिकेबाबत ही सुनावणी पार पडणार आहे. ६ तारखेच्या सुनावणीत शरद पवार गट आणि अजित पवार गट हे दोन्ही गट आपली भूमिका निवडणूक आयोगासमोर मांडणार आहेत. यापूर्वी राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाकडून अजित पवार गटाने केलेले सर्व दावे फेटाळून लावण्यात आले आहेत. शरद पवार गटाकडून पक्षात फूट पडली

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE